स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध होण्याबाबत करावयाच्या उपाययोजना.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१४/प्र.क्र.२/का-८
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०७/०१/२०१५

## परिपत्रक

राज्यात महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हापरिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती अशा पाच प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्यांची पाच वर्षाची मुदत संपण्यापूर्वी घेण्याचे सांविधानिक बंधन राज्य निवडणूक आयोगावर आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित अधिनियमांमधील प्रचलित तरतुदीनुसार आवश्यक त्या प्रमाणात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग यामधील व्यक्तींसाठी जागा राखून ठेवण्याची तरतूद आहे. मागासवर्गीयांसाठी आरक्षित करण्यात आलेल्या सदर प्रवर्गातून (स्त्री आरक्षणासहीत) निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांना नामनिर्देशनपत्राबरोबर जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

३. आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, जात वैधता प्रमाणपत्राअभावी राज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांतील मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेली अनेक पदे रिक्त राहतात. उदा: माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांच्या वेळेस अनुक्रमे **६१** आरक्षित पदांपैकी **४१** पदे **(६७%)** व **२२९** आरक्षित पदांपैकी **१९८** पदे **(८७%)** जात वैधता प्रमाणपत्राअभावी रिक्त राहीले आहेत. ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने भूषणावह नाही.

४. मागासवर्गीयांसाठी आरक्षित प्रभागातून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याबाबत आयोगाकडून वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. महानगरपालिकांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त, नगरपरिषदा व नगरपंचायतींबाबतीत जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी, जिल्हापरिषदा व पंचायत समित्यांच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी तसेच ग्रामपंचायतींच्या बाबतीत जिल्हाधिकारी सदर उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबवत असतील अशी आमची धारणा आहे.

५. तरी सदर परिपत्रकान्वये **कायम स्वरूपी उपाययोजना करण्याबाबत याद्वारे खालीलप्रमाणे निर्देश** देण्यात येत आहेत.

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम साधारणत: चार ते सहा महिने अगोदर आयोगाकडून घोषित करण्यात येतो.

या अनुषंगाने प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमास प्रसिध्दी माध्यमाव्दारे व्यापक प्रसिध्दी (उदा. **स्थानिक वृत्तपत्र, स्थानिक केबल चित्रवाणीद्वारे**) करण्यात यावी. या कार्यक्रमादरम्यान आरक्षणाचा तपशील सोडती नंतर प्रसिध्द झाल्यावर जनजागृतीचा एक भाग म्हणून निवडणूका होणाऱ्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात **ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मागासवर्गीय प्रवर्गासाठी पदे आरक्षित आहेत अशी ठिकाणे निवडण्यात यावीत. अशा ठिकाणी ग्रामपंचायती असल्यास ग्रामसभेमध्ये याबाबत जनजागृती करण्यात यावी आणि आवश्यक त्या ठिकाणी विशेष शिबीरांचे**

**आयोजन** करून इच्छुक उमेदवारांना त्वरीत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त होण्याच्या दृष्टीने आपणाकडून **विशेष प्रयत्न** अपेक्षित आहेत. **(उदा: पथनाट्य, आठवडा बाजाराच्या ठिकाणी व्यापक प्रसिध्दी तसेच शिबीरे आयोजित करावीत).**

(ii) पोट निवडणुकीच्याही संदर्भात, स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य पद रिक्त होताच असे पद आरक्षित असल्यास इच्छूक उमेदवारांनी वेळीच जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे याकरिता मतदार यादीच्या टप्प्या आधी याबाबत संबंधित प्रभागात व्यापक प्रसिध्दी करणे आवश्यक आहे.

(iii) सर्व जिल्हाधिकारी यांना असेही सूचित करण्यात येते की, त्यांनी जात पडताळणी समितीशी समन्वय साधून इच्छूक उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये काही उणीवा आढळून आल्यास त्याची माहिती संबंधित उमेदवारास तात्काळ देऊन त्याची त्वरीत पूर्तता केली जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरून जात वैधता प्रमाणपत्राअभावी एकही इच्छुक उमेदवार निवडणूक लढविण्यापासून वंचित राहू शकणार नाही.

६. वरील सूचनांचे काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्यात कसूर करणारे अधिकारी / कर्मचारी हे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार,

(मधुकर भि. गायकवाड)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व),
जिल्हाधिकारी (सर्व),
संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी
आयुक्त, महानगरपालिका (सर्व),
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व),
मुख्याधिकारी, नगरपालिका, नगरपंचायती (सर्व),

प्रत माहितीकरीता :-

१) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतीराज विभाग, मंत्रालय, मुंबई
६) आयोगातील सर्व निवडणूक कार्यासने